# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

**स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका**

Price ₹ 3/-

# संवाद

*मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ॥*
*सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ॥*

|| स्वयमेव मृगेंद्रता ||

**Vol.- 6 Issue 11 मे - २०१४ May 2014**


## संपादकीय

प्रिय सभासदमित्रांनो,

गेल्या काही दिवसांपासून आम्ही खरोखरच खूप सुखी आहोत, समाधानी आहोत, तृप्त आहोत आणि आनंदात आहोत. आम्हाला हे सुख-समाधान-तृप्तता नि आनंद कशामुळे प्राप्त झाला आहे असा तुम्हाला प्रश्न पडला असेल. म्हणूनच तुमची जिज्ञासा अधिक न ताणता आम्ही आमच्या मनाच्या या अवस्थेचे लगेच स्पष्टीकरण देत आहोत.

दिनांक १२ ते १४ एप्रिल असे तीन दिवस ठाण्यातील पाचपाखाडी भागातल्या भव्य निवृत्तिनाथ मंदिरात झालेली आदरणीय श्री. यशवंतजी पाठक यांची ज्ञानेश्वरी वरील प्रवचनमाला, त्यानंतर दि. १८ ते २३ एप्रिल असे सहा दिवस पुण्यातील सुप्रसिद्ध रामकृष्ण मठात पार पडलेली ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवावरील श्री. चैतन्यमहाराज देगलूरकर यांची प्रवचनमाला, तसेच त्यानंतर दि. २५ एप्रिल ते १ मे अशी सात दिवस पुण्याजवळील कात्रज येथील 'सरहदशाळेच्या आंगणात संपन्न झालेली श्रीमद्भागवत महापुराणावरील श्री संतसेवा संघाचे श्री. संजयजी गोडबोले यांची चिंतन-ज्ञानयज्ञात्मक प्रवचनमाला ऐकण्याचा सुयोग आम्हाला प्राप्त झाला. यानिमित्त महापुरुषांचे प्रेरणादायी विचार त्या क्षेत्रातील तज्ज्ञ, अभ्यासू अन् अधिकारी अशा महनीय व्यक्तींच्या तोंडून आम्हाला ऐकावयास मिळाले हा आमच्या दृष्टीने अवर्णनीय असा आनंदयोग-भाग्ययोगच होता. त्यामुळे आमची श्रवणेंद्रिये तृप्त झाली, हृदय आनंदाने उचंबळून आले आणि मनातील मरगळ नष्ट होऊन त्याला उभारी प्राप्त झाली. हाच अनुभव अन्य उपस्थितांनाही आला.

अशा प्रकारे जीवनातील आनंदयोग अनुभवावयास वरील सर्व कार्यक्रम कारणीभूत झाले असले तरी त्यातील पहिला म्हणजे श्री. यशवंतजी पाठक जे पुणे विद्यापीठाच्या ज्ञानदेव अभ्यासनाचे प्रमुख आहेत आणि संत साहित्याचे गाढे अभ्यासक आहेत त्यांच्या ठाण्यातील तीन दिवसांच्या प्रवचनमालेचा कार्यक्रम मात्र ठाणे-मुलुंड परिसरातील आपल्याच 'स्टेट बँक पेन्शनर्स सांस्कृतिक मंडळा'च्या वतीने तेथील श्रीज्ञानदेव सेवा मंडळाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करणे म्हणजे शिवधनुष्य पेलण्यासारखे होते. पण तेथील सुलभा आरोसकर या आपल्या उत्साही महिला कार्यकर्ती ने पुढाकार घेऊन भारती गद्रे, वसुधा खरे, ज्योती शहाणे, साधना जोग अशांसारख्या अन्य महिला कार्यकर्त्यांच्या साह्याने व सहकार्याने यशस्वीपणे हे शिवधनुष्य पेलून दाखविले आणि आपल्या शेकडो सभासदांना हा प्रवचन श्रवणाचा आनंद लुटता आला. या सर्व यशस्वी आयोजकांचे व त्यांना साह्यभूत होणाऱ्या सर्व घटकांचे आम्ही मनापासून अभिनंदन करतो. आपल्या 'संवाद'च्या संपादकीयामधून या कार्यक्रमाची विशेष दखल घेण्यामागील आमचा विशुद्ध हेतु एवढाच आहे की आमच्या ठिकठिकाणच्या सभासद कार्यकर्त्यांनी यापासून स्फूर्ती घेऊन असे कार्यक्रम आयोजित करावेत आणि आपल्या सहस्रावधी सभासदांना व त्यांच्या कुटुंबीयांना त्याचा लाभ घेण्याची संधी प्राप्त करून द्यावी. आपल्या सभासदांशी संबंधित अनेक ठिकाणी विविध संस्था-संघटना-मंडळे आहेत आणि त्यांच्याद्वारे असे प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित करणे अशक्य नाही. मात्र त्यासाठी आमच्या कार्यकर्त्यांच्या ठायी असलेली सुप्त इच्छाशक्ती जागी होणे आवश्यक आहे. ती इच्छाशक्ती जागृत होवो अशी आमची परमेश्वरापाशी प्रार्थना. शुभं भवतु.


**क्रांतिसेन रामचंद्र आठवले**

**मोबा. : ९८६९९४७६९१**

# R-EUPHORIA

## Kondhwa, Pune

मे. सुरेश घंगाळे अँण्ड असोसिएटस् सादर करीत आहे

सर्व प्रकारच्या आधुनिक सोयी सुविधांयुक्त प्रकल्प

**पुणे स्टेट बँक झोनल ऑफिस (गोळीबार मैदान)**

**पासून फक्त ४ की.मी. अंतरावर**

## रेडी पझेशन

फक्त रु. १ लाखात बुक करा आणि
कर्ज मंजुरीनंतर त्वरीत ताबा घ्या.

**दर रु.४७०१ प्रती स्क्वे.फूट**

एरिया - ९७५ स्क्वे.फूट आणि १०७५ स्क्वे.फूट
साईट - कोंढवा एन.आय.बी.एम. रोड जवळ

**प्रत्यक्ष भेट द्या**

साईट भेट - शनिवार व रविवार
विशेष - व्हॅट नाही, सर्व्हिस टॅक्स नाही.

-: संपर्क :-

**सुरेश घंगाळे**

**योगेश कन्स्ट्रक्शन**

**राजयोग कन्स्ट्रक्शन**

जी/१५ शांतीकुंज सोसायटी, साधू वासवाणी रोड, कॅम्प, पुणे - १.
मो.नं. ९३७१०१४८०७ / ७५०७८०६००७
ऑफिस नं.- ०२०-२६१२२०२१
वेळ सकाळी ११ ते ६

## State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle), Pune

## <u>Pune Zonal Sub Centre</u>

### **<u>Notice of Annual General Meeting on 11th June 2014</u>**

As decided in the meeting of the Managing Committee of Pune Zonal Sub-Centre held on 21st April 2014 the Annual General Meeting of Pune Zonal Sub-Centre comprising the Districts of Ahmednagar, Kolhapur, Pune, Sangli, Satara & Solapur will be held at 5 p.m. on Wednesday the 11th June 2014 at "Niwara Vruddhashram Sabhagriha, Navi Peth, Pune-411030 to transact the following Business.

1) To condole the death of the members who expired after last AGM held on 11th June 2013.
2) To confirm the minutes of the last AGM held on 11th June 2013 published in Samwad issue of July 2013.
3) Presentation of the Secretary's Annual report.
4) Felicitation of the members who have completed 75 years of age during the period between 12th June 2013 and 11th June 2014. (Letters have been sent to such members separately)
5) Reporting on the present scenario about pension issues.
6) Biennial Elections of the office bearers for the period 2014 - 2016. The notice to this effect has been published in the Samwad Issue of April 2014.
7) Any other business with the permission of the chair.

**Chandrakant Kulkarni**
Secretary

**<u>Note</u> -** "Pensioners' Meet" arranged by the Bank will be conducted during the above meeting.



## Our Writ Petition (C) No. 1875 of 2013 in Delhi High Court

As regards above Writ Petition our Federation has advised the details about what has happened on 17th April 2014 and its disappointment over the manipulations made by our Bank / the Government, preventing us from securing the much delayed justice from the Courts and posting of our above case to 25th September 2014 by Delhi High Court.

The case was posted to 25th September 2014, ignoring the strong and persistent plea made by our Senior Advocate Shri.P.N.Mishra, by pointing out the directions of the Supreme Court on the final disposal of our W.P. within outer limit of six months. In this connection it is advised by our Federation that Shri.Ravindra Srivastava, Senior Advocate engaged by us to plead our case in Delhi High Court was not available for final hearing posted on 17th April 2014 for certain reasons. He also did not indicate any convenient date to him so that our Advocate could seek a suitable date for the next hearing. So, we considered it not advisable to seek postponement by ourselves of the hearing of our W.P. posted on 17th April 2014. We therefore accepted the suggestion of our Advocate Shri.E.C.Vidyasagar to engage the services of another Senior Advocate Shri.P.N.Mishra. We briefed him adequately on all aspects of our case for pleading it effectively.

Our federation advised its concern for the delays being caused in hearing our W.P. by our Bank/Govt. by narrating the developments taken place at the last moment, when the Supreme Court was about to give its verdict at the hearing held on 27th February 2013 for final disposal, a merciless plea was made by our Bank against entertaining our W.P. under Article 32 resulting in our W.P. getting transferred to Delhi High Court with the completed pleadings and with directions to decide our case within an outer limit of six months. The first hearing of our transferred W.P. was held on 2nd April 2013. The Delhi High Court posted our case so far seven times. The latest hearing on 17th April 2014 was posted for final hearing. We therefore hoped that the hearing of our W.P. by Delhi High Court would soon come to an end. We did not realize that more manipulations would be made by our mighty Employer - the Bank for its postponement.

We were taken aback when in the Supplementary Cause List, a W.P. filed by one, Shri.Kiran Kumar Jaipuriar, a pensioner, representing himself as a petitioner in the Jharkhand High Court was listed to be heard along with our W.P. this W P was transferred to Delhi High Court with the consent of this Pensioner / Petitioner as per the Order of the Supreme Court in a Transfer Petition filed by our Bank. Shri.Kiran Kumar Jaipuriar is a Assistant Manager of our Bank, retired voluntarily on 30-04-1998 from a Branch of our Bank in Ranchi. He filed a W.P. in Jharkhand High Court on 08-03-2010 seeking the revision of his pension from 01-05-1998 on the salary revised as per 7th Bipartite Settlement in accordance with the formula introduced w.e.f. 01-03-1999 as a proviso to our Pension Fund Rule 23(2). He has also challenged that part of the amendment contained in Rule 23(2) which fixes 1st November 1993 as a date of retirement for consideration of the eligibility criteria for this revised formula of computation of pension. But only our Bank, the Trustees of our Pension Fund and the Branch Manager of Court Compound Ranchi Branch of our Bank are included as Respondents. The Government of India and Reserve Bank of India are not included as Respondents in this W.P. The order dated 17th April 2014 of the Delhi High Court indicates that notices to the Parties of this W.P. will be issued and our W.P. will be heard on 25th September 2014 along with the above W.P. as "After Notice Misc Matters". It appears that even on 25th September 2014, our W.P. will not be posted for "Final Hearing".

Our Advocates are seized of all the above issues. They are contemplating to take appropriate and immediate steps by filing Interlocutory (i.e. Interim) Applications in the Supreme Court/Delhi High

Court, keeping in view that our W.P. is a comprehensive one, challenging all the amendments to our Pension Fund Rule 23(2) stipulating varying monetary ceilings and seeking the stipulation of only one ceiling at 50% of the pensionable pay. There is no justification for clubbing our W.P. with the W.P. filed by the above pensioner or any other WPs filed by several other pensioners. The order of the Supreme Court passed in our W.P. for deciding our W.P. within an outer limit of six months would be meaningless, if more and more W.Ps are clubbed with our W.P. Further, the relief sought by the above pensioner / petitioner is also covered in our W.P., whereas Bank or the Trustees of our Pension do not have the powers to decide on the challenges made in the W.P. of the above pensioner on stipulating the cut-off date of 01-11-1993. The respondents in both the above W.Ps are different. The Respondents in the W.P. of the above pensioner do not have the powers to grant the relief sought therein.

Federation has advised that it shall take all possible steps as suggested by our Advocates to deal with the above issues successfully and will keep us advised of the developments in the matter.

***- Secretary***

*****************************************************************************************

## अभिनंदनीय

मुंबई येथील सभासद सौ.पूर्णिमा देशपांडे याचे पति व आपले सहसभासद श्री.प्रमोद देशपांडे यांनी नुकतीच 'रामं रमेशं भजे' नावाच्या एका ऑडिओ अल्बमची निर्मिती केली आहे. विशेष म्हणजे ह्या अल्बमची संपूर्ण संगीत-रचना प्रमोद वेशपांडे ह्यांची आहे. ह्या अल्बममध्ये रविंद्र साठे, उत्तरा केळकर, माधुरी करमरकर, आनंद भाटे, कल्याणी साळुंके-पांडे, मंदार आपटे, सुरेश बापट इत्यादी आघाडीच्या गायकांनी गायलेली श्री रामरक्षा स्तोत्र, तसेच रामगाणी, रामाचा पाळणा, राम-नाम धुन व रामाष्टक ह्यांचा समावेश आहे. ह्या अल्बमचे उद्घाटन सुप्रसिद्ध व्याख्याते श्री.सु.ग.शेवडे ह्यांच्या शुभहस्ते दि.११ एप्रिल २०१४ रोजी झाले. श्री.प्रमोद देशपांडे यांचे यानिमित्त अभिनंदन व पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा !

(संपर्क : श्री.प्रमोद देशपांडे मोबाइल क्र.०९८२००२५७२४)

******************

अहमदनगर येथील ज्येष्ठ सदस्य श्री.एस.एन.कुलकर्णी यांनी जरी बँकेतून २००१ मध्ये सेवानिवृत्ती घेतली तरी घरी स्वस्थ न बसता ज्योतिष व पौरोहित्य या दोन्ही विषयात शास्त्रशुद्ध शिक्षण पूर्ण करून वयाच्या ७१व्या वर्षी कृष्णमूर्ती ज्योतिष अभ्यास पद्धतीतील 'नक्षत्रशिरोमणी' ही पदवी संपादन केली. त्याबद्दल श्री.कुलकर्णी यांचे मन:पूर्वक अभिनंदन !

तसेच त्यांच्या सुकन्या सौ.संगीता सतीष काणे या कराड येथील शाळेत संगीत शिक्षिका असून त्यांच्या संगीत क्षेत्रातील विशेष उल्लेखनीय कामगिरीबद्दल दि.१२ मार्च २०१४ रोजी कऱ्हाड येथे स्व.यशवंतराव चव्हाण ह्यांच्या १०१व्या जयंती निमित्ताने शिक्षण मंडळ कऱ्हाड व टिळक हायस्कूल माजी विद्यार्थी सांस्कृतिक सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांना 'आदर्श शिक्षिका' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्याबद्दल सौ.संगीता काणे यांचेही असोसिएशन तर्फे हार्दिक अभिनंदन!

***- सेक्रेटरी***

## युनिट वार्ता

**अहमदनगर युनिट :**

अ.नगर पासून १२ कि.मी. अंतरावर निंबळक रस्त्यावर धर्मपुरी येथे दाट झाडीत पू.गजानन महाराजांचे एक मंदीर आहे. येथे रोज दुपारच्या आरतीनंतर उपस्थित सर्व भाविकांना प्रसाद म्हणून भोजन दिले जाते. आपल्या बऱ्याच सभासदांचा आग्रह होता की एके दिवशी आपल्या युनिटच्या सदस्यांतर्फे प्रसाद ठेवावा. त्यासाठी अनेक सदस्यांनी सढळ हाताने देणग्या दिल्या. आम्हास गुरूवार दि. १० एप्रिल २०१४ हा दिवस प्रसादासाठी मंदीर व्यवस्थापनाकडून मिळाला. सर्व सदस्यांना सहकुटुंब प्रसादाचे आमंत्रण देण्यात आले. आपले एकूण ८० सदस्य उपस्थित राहतील असा अंदाज होता. मात्र एप्रिलचे कडक ऊन व दुपारी १२ ची वेळ. त्यामुळे फक्त ४५ सदस्यांनी उपस्थिती लावली. व आपले सदस्य व इतर भाविक मिळून एकूण ४५० जणांनी प्रसाद ग्रहण केला. त्यानंतर मंदीर परिसरातील वृक्षांच्या सावलीत अध्यात्माबरोबर इतरही गप्पांचा कार्यक्रम रंगला. या कार्यक्रमास भगिनी वर्गाची उपस्थिती लक्षणीय होती.

- **शिवप्रसाद जोशी,** सचिव, अ.नगर युनिट

## अनुकरणीय

आपले पुणे येथील सभासद श्री.एम.आर.जोशी यांच्या पत्नि सौ.निर्मला मधुकर जोशी यांचे दि.१० एप्रिल २०१४ रोजी दु:खद निधन झाले. ते व त्यांचे कुटुंबीय अत्यंत दु:खात असतांनाही आणि नेत्रदानासाठी आधी स्वेच्छापत्र दिले **नसतानाही,** लगेच प्रसंगावधान राखून त्यांनी वेणू-माधव नेत्रपेढीशी त्वरित संपर्क साधला व कै.निर्मलाताईंचे नेत्रदान केले. श्री.जोशी व त्यांच्या कुटुंबीयांनी फार मोठ्या सामाजिक जाणिवेचे दर्शन घडवून नेत्रदानाच्या चळवळीला बळ दिले आहे व दोन दृष्टीहीनांना दृष्टीलाभ करून दिला आहे. त्याबद्दल श्री.एम.आर.जोशी व कुटुंबीय निश्चितच कौतुकास पात्र आहेत.

***- सेक्रेटरी***

# FEDERATION OF STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATIONS

Dt.: 01-02-2014

The Honourable Prime Minister of India
Government of India
New Delhi.

Respected Sir,

**Sub : Denial of legitimate pension to the Pensioners of State Bank of India - retired after 31-10-1987**

We seek your kind help and intervention for securing the rightful pension benefits to the pensioners of State Bank of India, retired after 31.10.1987 and place here under the details of our pension issues for your kind and just consideration.

2. We wish to submit the pension scheme of State Bank of India which provides for payment of pension to its employees at 50% of the monthly average salary for a minimum pensionable service of 30 years. Due to the directions issued by the Government, basic pension is curtailed even to the extent of 15% of pay to some pensioners. We only seek payment of pension to all pensioners at 50% of salary prevailing at the time of retirement to all eligible pensioners with a minimum pensionable service of 30 years. On this basis, the State Bank of India has submitted its proposals on 30.10.2002 to the Government seeking its approval for payment of pension subject to a ceiling of 50% of the last drawn pay to all pensioners retired after 31.10.1987. In this proposal, SBI has recommended only one ceiling on pension at 50% of the last drawn salary, following the basis adopted by the Government as per the recommendations of the Fifth Pay Commission. We only seek payment of our pension as per this proposal of SBI. The Government has not so far responded to this proposal of SBI. The directions issued by the Government from time to time have resulted in causing various discriminations among the SBI Pensioners.

3. At present, about 80% of the pensioners retired in the cadres of workmen and officers in Scale-I are paid their pension subject to a maximum of 50% of their salary. The pensioners retired as Officers in Scale-II and above are paid their pension at 40% of their pay. Further, all those retired drawing revised salary as per the Seventh Bipartite Pay Scales are not being paid their rightful pension computed on their actual revised salary as on the date of their retirement but still are being paid considerably reduced pension computed on the basis of the pre-revised Sixth Bipartite Pay Scales. The Government has however permitted the revision of pension on actual salary paid as per the subsequent revisions of salary made with effect from 01.11.2002 to 31.10.2007 and from 01.11.2007 to 31.10.2012 as per the Eighth and Ninth Bipartite Settlements respectively on the basis of 50%/ 40% formula referred to above. The revised pension paid to the pensioners retired during the Eighth and Ninth Bipartite Periods are substantially more than the pension payable on the Seventh Bipartite Pay Scales. Viewed from any angle, there could be no justification for the Government denying the payment of pension on the actual pay paid as per the Seventh Bipartite Pay Scales and not approving the proposal dated 30.10.2002 of SBI, which has categorically confirmed in this proposal that it has adequate capacity to meet its pension commitments. This proposal is only for payment of legitimate pension entitled on the basis of actual salary paid to the pensioners as per salary scales prevailing at the time of retirement and does not imply in any way the 'UPDATION of Pension' on the basis of the present salary scales, as provided by the Government to its pensioners.

As we could not succeed in our efforts to secure our legitimate pension after repeatedly knocking all the doors of the Government, we have filed a W.P. under Article 32 in the Supreme Court in March 2001. The prayer made in this W.P. only seek the payment of pension as recommended by SBI in its proposal dated 30.10.2002. This case has been transferred to a Division Bench of Delhi Court by the Supreme Court in February 2013 and is now pending in the Delhi High Court. A number of W.Ps filed by several pensioners, retired drawing Seventh Bipartite Pay Scales are pending before the various High Courts. Thus SBI pensioners have been forced to resort to many W.Ps in the respective High Courts.

5. It is most unfortunate that the decisions are being made by the Public Authorities in the Ministry of Finance ignoring the legal position obtaining and the adequately justified proposals of SBI. The directions are issued by the Government forcing the management of SBI to curtail the legitimate pension benefits as per its dictates rejecting the proposals of SBI. Repeated appeals made by us to the Government and SBI did not succeed. During the pendency of our W.P. in the Supreme Court, our case was transferred by the Supreme Court to 7th Lok Adalat in February in 2013 and notices were served on all the parties by the Legal Services Committee. We gave our consent for participation in this Lok Adalat. It appears that the Government and SBI did not respond positively to these notices and the opportunity given by the Legal Services Committee was also lost after the transfer of our W.P. to Delhi High Court.

6. The approach of the Government, RBI and SBI even in finding a legal solution is negative. All these W.Ps are pending without any immediate solution in sight mostly due to the lack of cooperation from the Respondents viz. Government, RBI and SBI. We have reasons to believe that the approach of the Government appears to be for keeping our pension issues either permanently or indefinitely in the sphere of litigation with the expectation that the most of the eligible pensioners would not survive, till the final verdict is pronounced by the Courts, though such impression is not correct, as pension being a property, the legal heirs of the deceased pensioners would be entitled to the benefits of a favourable verdict. In one of the recent judgments delivered, the Supreme Court on 11.12.2013 has directed the payment of pension with interest at 6% p.a. and with costs of Rs.50,000/- to the legal heirs of a deceased pensioner. We therefore solicit your intervention by issuing appropriate diectives to the authorities concerned in the Ministry of Finance for resolving our pension issues without prolonging the litigation and incurring wasteful and unwanted legal expenditure. The pending litigations should not however stand in the way of the Government taking decisions based on the proposal dated 30.10.2002 of SBI, as the relief sought in our W.P. would be granted if this proposal of SBI is approved. The recommendations made in this proposal of SBI are in conformity with the legal position obtaining, as confirmed by SBI itself in this proposal.

7. We therefore hope that the Government would discharge its role as a model employer and would not be responsible for rejecting the well justified proposal of SBI, one of its statutorily created old arm in the service of our nation ever since its inception. We look forward to your assistance and help us in securing our legitimate pension benefits as early as possible with your effective intervention.

Yours sincerely,
Sd/-
General Secretary
(P.P.Sankaranarayana Murthy)

# Joint Appeal by three Federations of Pensioners & Retirees of all Banks for improvement in pensionery benefits of Bank employees

Our Federation has advised that the above Joint Appeal has been made by **AIBPRC, AIBRF and our Federation to (1) the Secretary, Financial Services, Ministry of Finance, Dept of Economic Affairs, Banking Division, New Delhi; (2) The Chairman, Indian Bank's Association, and (3) The Convener, UFBU and other members of UFBU.** This Joint Appeal was signed at a meeting of the office-bearers of the above three organizations held on 16th April 2014 at New Delhi. This Joint Appeal is reproduced here for information of our members.

*************************************

Respected Sir,

We request you to spare some of your valuable time over a few important issues confronting all the Retirees and Pensioners of the Banking Industry.

ii. The retirees of the Banking Industry are all senior citizens in the age group of 60 to 80 years. having joined the Banks before or immediately after the nationalization of the Banks, they have worked in every nook and corner of our country, implementing the policies of the growth of our economy and for the welfare of all sections of our society. Their pioneering role is responsible for the vibrant and healthy growth of the Banking Industry in our country. They deserve to be shown consideration and help to enable them to lead their retired life with dignity.

**1. Revision of Pension with every revision of salary :**

With constant and substantial erosion in the real value of our currency, the purchase value of the pension paid on the basis of very low salary scales prevailing at the time of their retirement is hardly adequate to meet the sustenance and health care needs of the ageing pensioners of the Banks. Although the pension scheme of the Bank employees has been drawn on the lines of the Pension Scheme of the Government and specific mention made in pension regulations, the pension of the retired employees of the Banks are not revised on subsequent revisions of salary, as is done by the Government for its pensioners. As a result, endless distortions and discrimination is taking place. The pension of a General Manager retired 10 to 15 years back is much lower than his junior colleagues retiring during the subsequent years. Apart from this discrimininatory position, the aged pensioners need to live with dignity, for which the real value of their pension needs to be protected by periodical revision just in the same way the salary scales are revised. Pension being a deferred wage, pension of all the past employees of the Banks need to be revised along with future revision of salary made every five years for the Bank employees. In different bilaterally agreed minutes there are repeated mentions that such updations will take place and the Bank Regulations do certain provisions for this purpose. The apprehension that the Banks would not be able to meet the provisioning requirements of the Banks as per AS-15 norms is not warranted. Sample study reveals that our Banks have that capacity to meet these requirements. The provisioning requirement and the actual annual out go for the payment of pension on updated salary scales can comfortably be met by the Banks. We trust that this important request will be favourably considered.

**2. Family Pension :**

The family pension paid by the Banks is most significant with most of them getting it at 15% of pay. The Pension Regulations of Banks provide for the payment of family pension based on the RBI Pension Scheme. The Reserve Bank of India has since revised family pension at 30% of pay to all its family pensioners on the same basis as paid by the Government. The gross family pension of the top most official of the Banks does not exceed Rs.7,000/- which is totally inadequate in these hard days

of hyper inflation. RBI has higher limit of Rs.24,495/- and minimum rs.9,500/- as family pension.

**3. 100% Neutralization of Dearness Relief to pre 01-11-2002 Pensioners of Banks :**

The most glaring injustice done is the denial of the above improvement made to Banks' pensioners retired on or after 01-11-2002 to the pensioners retired before 01-11-2002. All pensioners of Banks are members of the same pension scheme and belong to a class. The Retirees before 01-11-2002 get lesser quantum of compensation because 100% neutralization is not offered to them, where as the retirees after 01-11-2002 get better compensation with 100% neutralization of DA with effect from 01-05-2005. This has to be extended to the surviving pensioners retired before 01-11-2002 also. The Reserve Bank of India is providing 100% neutralization of DA to all its pensioners with effect from 01-02-2005. This unjust discrimination needs to be removed without any delay.

**4. Pension issues of State Bank of India :**

The well accepted norm in all organisations viz. Central Government and State Governments, Nationalised Banks etc. on payment of pension at 50% of the last drawn average pay is denied to the pensioners of SBI retired as Officers in Scale-II and above. This discrimination in the payment of pension by SBI needs to be removed immediately.

**5. Improved Medical / Hospitalisation Scheme for the Retirees :**

At present the banks are having different schemes with varying norms in providing the above scheme. Inadequacy of the amounts, lack of uniformity and lack of quity needs to be addressed in providing this very important facility. We strongly appeal for a uniformmedical assistance schemes including for hospitalisation.

**6. Representation to the Pensioners' organizations in Bilateral Forums :**

The UFBU, the organization of our younger colleagues serving in the Banks have been incorporating in their demands some improvements for the Pensioners. The pensioners do need a platform for hearing their views. At present no opportunity is given to our organizations for presenting our views to Government/IBA before the conclusions of the bipartite wage and pension settlement. This lack of opportunity to us has resulted in the neglect of the interests of the pensioners. The Central Pay Commissions provided such opportunities to the various organizations of the pensioners of the Government. As in the days of the pensioners of the Government a proper opportunity and forum to represent our demands and views may be provided to the organizations of the Bank Pensioners/ Retirees.

**7. Other Issues :**

There are certain other issues of importance concerning the retirees of Banks. The denial of equity to the retirees of the Private sector Banks, denial of option to Pension to the Resigned Retirees and those retired compulsorilly with eligible pensionable service, parity of RRB Employees in respect of superannuation benefits and further improvement for pre 01-11-1986 retirees.

We, three organizations of the Pensioners / Retirees represent more than 2 lac members. We are making this earnest appeal with the strong hope that this representation will receive your due consideration. We trust that a positive decision would soon be taken in the interests of the Bank employees who are mostly in advance age. The stark reality is that they are in their twilight years without much time left for them. We do hope that timely justice would be rendered to them. We look forward to a favourable and an early action and reply.

| | | |
|---|---|---|
| S.R.Sen Gupta | S.C.Jain | P.P.S.Murthy |
| General Secretary | General Secretary | General Secretary |
| All India Bank Pensioners & Retirees Confederation | All India Bank Retirees' Federation | Federation of SBI Pensioners Associations |

## स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल) पुणे
## अमरावती झोनल सब-सेंटर

### दि.१४ मार्च २०१४ रोजी झालेल्या पहिल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

दि.१४ मार्च २०१४ रोजी अमरावती येथील डॉ.जोशी हॉल येथे सकाळी १०.३० वाजता अमरावती झोनल सब-सेंटरची पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

सभेच्या कार्यक्रम पत्रिकेप्रमाणे वार्षिक सर्वसाधारण सभा सकाळी ठीक १० वाजता सुरू होत असल्याचे सचिव श्री. ज्ञानप्रकाश खोब्रागडे यांनी जाहीर केले. परंतु पुरेशा गणसंख्ये अभावी सदर सभा ३० मिनिटांसाठी स्थगित करून ठीक १०.३० वाजता सभेचे कामकाज त्याच ठिकाणी सुरू झाले. कार्यक्रम पत्रिकेप्रमाणे प्रथम झोनल सब-सेंटरच्या कार्यकारिणीच्या २०१४-२०१६ या कालावधीसाठी पदाधिकाऱ्यांच्या निवडणुका हा विषय होता. परंतु वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी अध्यक्ष व प्रमुख अतिथी श्री.टी.एम.सेबास्टीअन्, सहा.महाप्रबंधक, अमरावती शाखा व श्री.राजेश शेठ, सहा.महाप्रबंधक, अमरावती कॅम्प शाखा, यांना उद्घाटन कार्यक्रमानंतर लगेचच बँकेत परत जावयाचे असल्याने सचिवांनी सभागृहाच्या परवानगीने आधी वार्षिक सभेच्या उद्घाटनाचा कार्यक्रम व नंतर निवडणूक हा विषय घेण्याचे जाहीर केले.

त्याप्रमाणे आपल्या खामगांव येथील सभासद सौ.सुचेता हातेकर यांनी श्री गणेश-स्तवन गायले व त्यानंतर त्यांनी सर्व मान्यवरांना आदरपूर्वक मंचावर आमंत्रित केले. सर्व मान्यवरांनी टाळ्यांच्या गजरात व्यासपीठावरील स्थान ग्रहण केले. वार्षिक सभेचे उद्घाटक अमरावती शाखेचे सहा.महाप्रबंधक श्री.टी.एम. सेबास्टीअन् व प्रमुख अतिथी म्हणून श्री.राजेश शेठ, स.म.प्र.,अमरावती कॅम्प शाखा यांचे पुष्पगुच्छ देऊन अनुक्रमे श्री.निमदेव व श्री.खोब्रागडे यांनी स्वागत केले. त्यानंतर कार्यक्रमाची सुरूवात पाहुण्यांचे हस्ते पारंपारिक सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने करण्यात आली.

या नंतर सचिव श्री.खोब्रागडे यांनी सर्वप्रथम गेल्या वर्षी ज्या सदस्यांचे निधन झाले त्यांची नावे सभागृहास वाचून दाखविली. सर्व दिवंगतांबद्दल शोक संवेदना व्यक्त करण्यासाठी उपस्थितांनी दोन मिनिटे मौन उभे राहून आपली श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर सर्कल असोसिएशनचे उपाध्यक्ष श्री.पी.एन.नारकर (पणजी) व सचिव श्री.आर.एन.लळींगकर (पुणे) यांचे वार्षिक सभेसाठी आलेले संदेश वाचून दाखविले.

सचिव श्री.खोब्रागडे यांनी दि.४.८.२०१३ रोजी अमरावती झोनल सब-सेंटरच्या उद्घाटन सभेचा वृत्तांत (सदर वृत्तांत 'संवाद' च्या ऑक्टोबर २०१३ च्या अंकामध्ये छापलेला आहे) सभागृहास वाचून दाखविला. त्यानंतर त्यांनी झोनल सब सेंटरच्या स्थापनेपासून ते आत्तापर्यंत झोनल सब-सेंटरच्या सभासद संख्येत कशी वाढ झाली हे सविस्तरपणे सांगून प्रत्येक युनिटच्या पदाधिकाऱ्यांनी घेतलेल्या परिश्रमांबद्दल व केलेल्या सहकार्याबद्दल गौरवोद्गार काढून कृतज्ञता व्यक्त केली. आज मितीस अमरावती झोनल सब-सेंटरची सदस्य संख्या विभागवार खालीलप्रमाणे आहे असे ते म्हणाले.

| | |
|---|---|
| अमरावती | ५६४ |
| अकोला | ४६४ |
| बुलडाणा | ३३६ |
| यवतमाळ | ३१२ |
| वाशीम | २८ |
| **एकूण** | **१६९३** |

यानंतर झोनल सब-सेंटरचे कोषाध्यक्ष श्री.विनायक जळीत यांनी झोनल सब-सेंटरच्या स्थापनेपासून सभेच्या तारखेपर्यंतच्या ७-८ महिन्याच्या कालावधीतील आर्थिक घडामोडींचा अहवाल सभेस सादर केला. तो येणेप्रमाणे :

| | |
|---|---|
| मेंबरशिप फी व ॲडमिशन फी | रु. ९६,७२०/- |
| लीगल फंड व इतर देणग्या | रु. ९,५०१/- |
| **एकूण** | **रु.१,०६,२२१/-** |

श्री.जळीत यांचे आवाहनानुसार उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात वरील आर्थिक अहवालास मान्यता दिली.

त्यानंतर पुढील सदस्यांचा त्यांच्या वयाची ७५ वर्षे पूर्ण झाली म्हणून प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व मिठाई देऊन हार्दिक सत्कार करण्यात आला. त्यात सर्वश्री उपेंद्र शं. पांडे, केशव शंकर वैद्य (अमरावती), नीळकंठ स. नागराज (अकोला), व्ही.जी.चांदूरकर, आर.एन. खवसे, श्रीमती सुशीलाबाई बोरकर (बुलडाणा) व श्रीमती जशोदाबाई पु. मंत्री (मोर्शी) ह्यांचा समावेश होता. सत्कारानंतर सत्कारमूर्तींच्यावतीने श्री.केशव वैद्य व श्री.नीळकंठ नागराज यांनी सत्काराला समयोचित उत्तर देऊन संघटनेप्रती कृतज्ञता व्यक्त केली व या एका अतिशय भावपूर्ण सत्कारामुळे संघटनेशी

असलेली बांधिलकी द्विगुणीतच नव्हे तर शतगुणीत झाली आहे असे म्हणून कृतकृत्यता वाटते म्हणून सांगितले. सर्वश्री वसंत ल. पोहेकर, सुधाकर ज. ठेंगडी व मधुकर रा. कुळकर्णी हे प्रकृती अस्वास्थ्यामुळे कार्यक्रमास उपस्थित राहू शकले नाहीत म्हणून कार्यक्रमानंतर त्यांचे पंचाहत्तरीचे सत्कार व अभिष्टचिंतन त्यांचे घरी जाऊन करण्यात आले. तसेच यवतमाळचे सदस्य व कोषाध्यक्ष श्री.उमेश इनामदार यांचा वाढदिवस १४ मार्च रोजी (या सभेच्या दिवशी) असल्याने अध्यक्षांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

या नंतर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री.राजेश शेठ यांनी आपले मनोगत व्यक्त करताना पेन्शनर्स असोसिएशनच्या अमरावती झोनल सब-सेंटरच्या पहिल्या वार्षिक सभेत भाग घेण्याचा व त्या निमित्ताने ज्येष्ठ सहकार्यांसोबत काही वेळ घालविण्याची संधी मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. तसेच अमरावती झोनल सब-सेंटरच्या निरनिराळ्या उपक्रमांबद्दल समाधान व्यक्त करून त्यांच्या सदस्यांबद्दल नेहमी सकारात्मक प्रतिसाद आपत्याकडून व बँकेच्या सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून मिळेल असे आश्वासन त्यांनी दिले. तसेच आपआपल्या प्रकृतीनुसार योग, प्राणायाम इत्यादीद्वारे नियमित जीवनप्राणाली जगण्याची उमेद कायम ठेवावी व सध्याच्या मोबाईल व गतिमान जीवनशैलीशी जुळवून घेताना नव्या-जुन्यांमधील संघर्ष टाळून आपले उर्वरित जीवन दुसऱ्यांच्या सुखा-समाधानासाठी जगताना आपलेही समाधान शोधावे व त्याचप्रमाणे समाजाचेही आपण काही प्रमाणात ऋण समजून समाजाला काही देता आल्यास जरूर द्यावे. त्यानंतर त्यांनी सर्व सभासदांच्या निरामय दीर्घायुष्याबद्दल शुभकामना व्यक्त केली.

त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.सेबास्टीअन् यांनीही अमरावती झोनल सब-सेंटरच्या कार्यपद्धतीबद्दल व प्रगतीबद्दल प्रशंसोद्गागार काढून सर्वांना सुखी समाधानी जीवन प्राप्त व्हावे म्हणून शुभेच्छा दिल्या. या वार्षिक सभेचा दिवस हा बँकेच्या दैनंदिन व्यवहाराचाही दिवस असल्याने कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख अतिथी यांना बँकेत परत जावयाचे असल्याने व मार्च महिन्यातील बँकेच्या वर्ष अखेरीच्या कार्यव्यस्ततेतूनही आपला बहुमुल्य वेळ देऊन कार्यक्रमाची शोभा वाढविली व सर्व माननीय अतिथींनी पेन्शनरांच्या उत्साहात सामील झाल्याबद्दल सचिवांनी त्यांना साभार निरोप दिला.

आधी जाहीर केल्याप्रमाणे झोनल सब-सेंटरच्या द्वैवार्षिक निवडणुका घेण्यासाठी निवडणूक अधिकारी श्री.बाळासाहेब काळे यांना पाचारण करण्यात आले. त्याप्रमाणे श्री.काळे यांनी व्यासपीठावर येऊन पुढील निवेदन केले. श्री.खोब्रागडे सचिव पदासाठी व श्री.वि.म.जळीत कोषाध्यक्षपदासाठी यांचीच केवळ नामनिर्देशन पत्रे प्राप्त झाल्याने त्यांची, त्यांनी अर्ज केलेल्या पदांवर बिनविरोध निवड होत असल्याचे घोषित केले. त्यानंतर उपाध्यक्षपदासाठी श्री.मुणोत व श्री.नागराज यांचे अर्ज प्राप्त झाले होते. तसेच सह-सचिव पदासाठी श्री.गाडगे व श्री.भट्टड यांची नामांकने प्राप्त झाली होती. परंतु सभा सुरू होण्यापूर्वी थोडावेळ आधीच श्री.नागराज व श्री.गाडगे यांनी आपले अर्ज मागे घेतल्यामुळे श्री.मुणोत व श्री.भट्टड यांचीही बिनविरोध निवड घोषित करण्यात आली व टाळ्यांच्या प्रचंड गजरात अमरावती झोनल सब-सेंटरची २०१४-२०१६ या कालावधीसाठीची अधिकृत कार्यकारिणी खालीलप्रमाणे घोषित करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| श्री.ए.पी.निमदेव (अमरावती) | अध्यक्ष | मो.८३०८६७३७३५ |
| श्री.एम.जी.मुनोत (बुलडाणा) | उपाध्यक्ष | मो.९४२१४७३०१५ |
| श्री.डी.बी.खोब्रागडे (अमरावती) | सचिव | मो.९३७२०३४४६४ |
| श्री.डी.एच.भट्टड (अकोला) | सह सचिव | मो.९४२१५५४८४१ |
| श्री.व्ही.एम.जळीत (अमरावती) | कोषाध्यक्ष | मो.९३७२७९२८०८ |

श्री.बाळासाहेब काळे यांनी अमरावती झोनल सब-सेंटरच्या कार्यक्षेत्रातील अमरावती, अकोला, यवतमाळ व बुलडाणा येथील युनिटचे नवनिर्वाचित सचिव यांना झोनल सब-सेंटरच्याा कार्यकारिणीचे पदसिद्ध सदस्य तसेच जिल्हा संघटक म्हणून घोषित केले.

निवडणुकीच्या कार्यक्रमानंतर संघटनेचे निर्वाचित अध्यक्ष श्री.निमदेव यांनी सर्व सभासदांच्या सहकार्याबद्दल व त्यांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल सर्वांचे आभार मानले. भोजनासाठी सभा एक तास तहकूब केल्याचे सांगून त्यानंतर अमरावती क्षेत्रीय व्यवसाय कार्यालयाद्वारे 'पेन्शनर्स मीट' होणार असल्याचे जाहीर केले.

भोजनोत्तर दुपारी ३.०० वाजता अमरावती आर.बी.ओ. चे सहा.महाप्रबंधक श्री.सुरेश तामसकरसाहेब यांचे अध्यक्षतेखाली पेन्शनर्स मीट होणार होती. परंतु, श्री.तामसकर यांना अत्यंत महत्वाच्या कामानिमित्त बाहेरगावी जावे लागल्याने आर.बी.ओ.चे चीफ मॅनेजर श्री.अश्विन चौधरी यांचे अध्यक्षतेखाली पेन्शनर्स मीट सुरू झाली. सर्वप्रथम अध्यक्ष श्री.निमदेव यांनी सभेचे प्रमुख अतिथी श्री.चौधरी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर खास या कार्यक्रमासाठी मुंबई झोनल सब् सेंटरचे मुलुंड विभागाचे रीजनल सेक्रेटरी श्री.जयंत पुसाळकर मुंबईहून आले होते त्यांचेही स्वागत श्री.खोब्रागडे यांनी केले. त्यानंतर अमरावती येथील अस्मिता संगीत कला मंदिराच्या विद्यार्थीनींचे स्वागत-गीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली.

पेन्शनर्स मीटला सुरुवात करतांना सचिवांनी अमरावती आर.बी.ओ.कडून नेहमी मिळत असलेल्या सहकार्याबद्दल उल्लेख करून धन्यवाद दिले. तसेच सभासदांच्या निधनानंतर फॅमिली पेन्शनची केस शक्य तेवढ्या लवकर निकालात निघण्यासाठी आर.बी.ओ.तर्फे प्रयत्न केले जातात व सेवानिवृत्तांच्या निवृत्तीच्या वेळी काही देय रकमांविषयी असलेल्या त्रुटी पूर्ण करून त्यांना त्यांची रक्कम वेळेत मिळते असे सांगितले. यानंतर श्री.पुसाळकर यांनी आपल्या मनोगतात संघटनेद्वारे केंद्रीय स्तरावर आपल्या न्याय्य मागण्यांच्या संदर्भात सुरू असलेल्या पाठपुराव्याविषयी माहिती दिली व आपल्याला लवकरच न्याय मिळेल असा ठाम आशावाद व्यक्त केला.

नंतर पेन्शनर्स मीटचे अध्यक्ष श्री.अश्विन चौधरी यांनी आपल्या भाषणात आर.बी.ओ.ऑफिस पेंशनरांच्या बाबतीत कसे तत्पर असते हे सांगून आर.बी.ओ. चे सहा.महाप्रबंधक श्री.तामसकर साहेबांच्यावतीने सर्व उपस्थित सदस्यांना शुभेच्छा देऊन सभेसाठी बोलाविल्याबद्दल आभार मानले..

नंतर झोनल सब-सेंटरचे कोषाध्यक्ष श्री.जळीत यांनी आभार प्रदर्शन केले व चहापानानंतर सभा संपन्न झाली.

– **डी.बी. खोब्रागडे**, सचिव, अमरावती झोनल सब् सेंटर

*****************************************************

## श्रद्धांजली - कै.अरविंद काळे

२२ मार्च २०१४ हा दिवस आमच्यासाठी जणू काळा दिवस म्हणूनच उगवला. सकाळी ११ वाजता आमचे सहकारी अरविंद काळे यांना घरात असतानाच चक्कर आली म्हणून काळे वहिनी त्यांना घेऊन हॉस्पिटलमध्ये गेल्या. पाठोपाठ आम्ही सोसायटी सदस्य तिकडे धावलो. परंतु दुर्दैवाने घरून निघतांनाच किंवा वाटेतच सर्व काही आटोपले होते. नंतरचे सोपस्कार, त्यांचे दुबईस्थित चिरंजीव अतुल हा पुण्यात आल्याशिवाय करणे शक्य नव्हते. त्यामुळे या दुर्दैवी घटनेची माहिती त्यांच्या मित्रपरिवाराला देऊ शकलो नाही.

२००६ मध्ये त्यांचे 'बायपास' आणि एक वर्षापूर्वी 'प्रोस्टेट' आणि 'हार्निया' या शस्त्रक्रिया झालेल्या होत्या. त्यानंतरच्या काळात मात्र योग्य तो आहार, विहार आणि व्यायाम याद्वारे त्यांनी स्वत:ला कार्यक्षम ठेवलेले होते. आपल्या पेन्शनर्स असोसिएशनच्या पुणे कार्यालयातील लायब्ररी आम्ही, म्हणजे अशोक वाकचौरे, (कै.)अरविंद काळे, रमेश वैद्य एकमेकांच्या वेळांनुसार आलटून पालटून जवळजवळ गेली कांही वर्षे सांभाळीत होतो. सध्या ती गेल्या काही वर्षांपासून सुभाष बेलसरे चालवीत आहेत. श्री.मधुकर सरदेशमुख यांनी सुरू केलेल्या स्नेहमंडळाच्या कामात काळे यांचा उत्स्फूर्त सहभाग असायचा. तसेच असोसिएशनच्या पुणे येथे होणाऱ्या वार्षिक अधिवेशनामध्येसुद्धा सक्रीय सहभाग असायचा.

आम्ही एकाच इमारतीमध्ये राहात होतो तरी दिवसेंदिवस आमची भेट होत नसे. नंतरच्या भेटीचेवेळी मात्र त्या दिवसांमधे काय झाले याचा आढावा ठरलेला असायचा. मी कुठल्याही प्रवासाहून आलो की त्यांना त्या बद्दलचा प्राथमिक अहवाल द्यावाच लागायचा. आम्ही दोघेही एकमेकांना सरावलो होतो. माझे गुडघ्याचे ऑपरेशन झाले तेव्हा तर त्यांची खूपच मदत झाली. अगदी बँकेची पासबुके भरून आणायची, तसेच औषधे आणून देण्यापर्यंत त्यांची मदत असायची. मध्यंतरी ते वहिनींसह अतुलकडे दुबईला तीन महिने राहून आले तेव्हां तर अतुलविषयी खूप अभिमानाने बोलायचे. नातू अथर्व याच्यावर तर फार लोभ. कांही दिवसापूर्वीच अथर्वचा, मलेशिया येथे झालेल्या इंटरनॅशनल गणिताच्या परिक्षेत तीस देशांमधील मुलांमध्ये तिसरा नंबर आला तेव्हा त्याविषयी बोलतांना त्यांना कोण आनंद झाला होता. त्यांच्या मोबाईलमध्ये तर त्यांनी नातवाच्या आवाजतला 'आबा, फोन येत आहे, फोन घ्या' हा रिंगटोन सेट केला होता. त्यांना सुनेचेही खूप कौतुक. दुबईला त्यांच्या सुनेचे विविध उपक्रम चालू असतात. इथून बरीच मराठी पुस्तके घेऊन जाऊन तिथे तिने लायब्ररी सुरू केली, याबद्दल ते नेहमी सांगायचे. दुबईहून आल्यावर त्यांचा एक प्रवासवर्णनपर लेख संवादमध्ये प्रसिद्ध झाला होता.

त्यांचे 'अजातशत्रु' असे व्यक्तिमत्व ! कोणाला लागेल असे बोलणे त्यांच्या स्वभावातच नव्हते. एकदा त्यांचे एका सोसायटी सदस्याबरोबर मतभेद झाल्यावर अनवधाने त्याला लागतील असे शब्द तोंडातून बाहेर पडले. त्याच दिवशी रात्री त्या सभासदाचे घरी जाऊन त्यांनी त्याची क्षमा मागितली. कामामध्ये घाईगडबड न करता विचारपूर्वक पाऊल टाकायचे असा त्यांचा स्वभाव. सार्वजनिक काम करण्याची आवड तर होतीच. प्रेमनगर ज्येष्ठ नागरिक संघामध्ये कोणतेही काम करण्याची तयारी असायची. आमच्या निशांत सोसायटीचे हिशेब अगदी ३१ मार्चला तयार असायचे.आमच्या समोर एक स्कूटर मेकॅनिक आहे. त्याचेकडे एक बारक्या नावाचा कामगार आहे. त्याच्यावर काळेसाहेबांचा खूप लोभ. त्याला चांगले कपडे द्यायचे व इतर मदतही करायचे. त्याला काळेसाहेब गेल्याचे कळल्यावर त्याचे डोळे भरून आले होते. त्यांच्या निधनाने सर्वच बाबतीत माझा व्यक्तिगत तोटा झालेला आहे. अजुनही वाटते, कधीतरी दुपारी खालच्या खिडकीतून त्यांची हाक येईल की, 'अशोक, बँकेत जायचे कां?' आम्ही जेव्हा 'वैकुंठ'ला अंत्यविधीसाठी जायला निघालो तेव्हा गाडीत बसल्यावर अनवधानाने मनात आले, 'अरे, काळेसाहेब राहिलेच कीं !'

असे हे प्रामाणिक आणि सज्जन व्यक्तिमत्व २२ मार्च रोजी अनंतात विलीन झाले. त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात आम्ही सोसायटी सदस्य व आपली पेन्शनर्स असोसिएशन सहभागी आहोत. ईश्वर त्यांचे आत्म्यास सद्‌गती देवो.

**– अशोक वाकचौरे**

मो.: ०९९२२०६८९८७

# State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle) Pune

## PANAJI ZONAL SUB-CENTRE

**Proceedings of the Annual General Meeting held on 6th April 2014**

The 16th Annual General Meeting of Panaji Zonal Sub-centre covering Goa, Sindhudurg & Ratnagiri Districts was held at Staff Learning Centre, Panaji on 6th April 2014. Around 200 members including Associate members and Family Pensioners attended the meeting. The dignitaries who attended the Meeting included Shri. Indu Sekhar, DGM (B&O), Shri.S.B.Gokhale, President of Mumbai ZSC, Shri.C.P.Kulkarni, Secretary of Pune ZSC, Shri.R.S.Rajivadekar, Principal Secretary of Mumbai ZSC, Shri.D.B.Khobragade, Secretary of Amravati ZSC, Shri.A.G.Pandit, and Shri.M.M.Sardeshmukh from Pune.

